क्र.२/नसवि/महासभा/ ०३ /२०१८-२०१९
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ३० मे २०१८

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०३ /२०१८-२०१९

## महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------------------------------------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक ०७/०६/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

30.5.2018
**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. *मागील सर्वसाधारण सभा दि.२९/०५/२०१८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.*

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका क्षेत्रातील शांतीसागर सोसायटी मिरज येथील महापालिकेच्या मालकीची स.नं.९५४/६ मधील ४०५० चौ.मी.ची खुली जागा शाळेच्या मुलांना खेळण्यासाठी व विविध उपक्रमांसाठी कार्यवाह, मिरज विद्या समिती,मिरज यांना वार्षिक भाडे र.रु.५,५३,१३९/- मात्र (अधिक जी.एस.टी.) दर तीन वर्षानी २०% भाडेवाढ यानुसार २९ वर्षे मुदतीने जागा भाडेपट्टयाने देणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२८/०५/२०१८ चे विषयपत्र.**

५. महापालिका क्षेत्रातील दि.अं.यो.राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालास प्रदर्शन व विक्री करणेस श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील विद्यामंदिर मनपा शाळा क्र.१० मधील पश्चिम दक्षिण बाजूची खुली जागा मिळणेस निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०७/०३/२०१८ चे विषयपत्र.**

६. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

७. *मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.*

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

30.05.2018
**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका**

**सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०३/२०१८-२०१९**

**महापालिका सभा दिनांक ०७/०६/२०१८ करीता.**

गुरुवार दि.०७/०६/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

**१. मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

नैराश्य निर्मुलन संस्था, सांगली या संस्थेवर डॉ.नामदेव गेंदाप्पा घाडगे हे सचिव पदावर काम करीत असून, महानगरपालिका क्षेत्रातील गोरगरीब नागरिकांचेवर मोफत उपचार करीत असल्यामुळे त्यांच्या चांगल्या उपक्रमासाठी सांगली वॉर्ड क्र.१६ मधील राजर्षी शाहू कॉलनी मधील प्राथमिक शाळा क्र.३८ ही महापालिका मालकीची असून, या शाळेच्या आवाराबाहेर एक खोली नैराश्य निर्मुलन संस्थेस देणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

---

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : ०५/०६/२०१८.

**महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- ०७/०६/२०१८

ठराव क्रमांक :- 20

विषय क्रमांक :- ०१

---

मागील सर्वसाधारण सभा दि.२९/०५/२०१८ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.०२ ते ठराव क्र.१९ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे. मागील इतिवृत्तातील सर्व ठरावास श्री.मैनुद्दीन बागवान व जरिना बागवान यांनी विरोध दर्शविला. इतिवृत्त बहुमताने मंजूर करणेत आले.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

महासभा विभाग

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- ०७/०६/२०१८

ठराव क्रमांक :- २४

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२८/०५/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील शांतीसागर सोसायटी मिरज येथील महापालिकेच्या मालकीची स.नं.९५४/६ मधील ४०५० चौ.मी.ची खुली जागा शाळेच्या मुलांना खेळण्यासाठी व विविध उपक्रमांसाठी कार्यवाह, मिरज विद्या समिती,मिरज यांना वार्षिक भाडे र.रु.५,५३,१३९/- मात्र (अधिक जी.एस.टी.) दर तीन वर्षानी २०% भाडेवाढ यानुसार २९ वर्षे मुदतीने जागा भाडेपट्ट्याने देणेबाबत विषयांकीत प्रस्ताव सादर केला आहे. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार प्रस्तावित ठिकाणी असलेले उद्यान महापालिका व आमदार फंडातून विकसीत करणेत आलेले असून, सदर जागेचा वापर नागरिक सार्वजनिक कार्यासाठी करीत आहेत. यासाठी सदरची जागा महापालिका मालकीची असल्याने, मागणी केले संस्थेस न देता, नागरिकांना सार्वजनिक वापरासाठी व सदर शाळेच्या मुलांना खेळण्यासाठी खुले ठेवणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा. किशोर जामदार)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- (मा. बाळासाहेब ओंबळे)

मान्य/ व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- ०७/०६/२०१८

ठराव क्रमांक :- 25

विषय क्रमांक :- ०५

---

सोबतचे उपायुक्त (ना.दा.नि.कक्ष) यांचे दि.०७/०३/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील दि.अं.यो.राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत बचत गटांतील महिलां उत्पादित करीत असलेल्या पापड,शेवया,विविध प्रकारचे मसाले,चटणी, साडी विक्री,अगरबत्ती,कोल्हापुरी चप्पल,हार बांबू काम इत्यादी व्यवसायासाठी व उत्पदित केलेला माल विक्री करणेस बाजारपेठ उपलब्ध करुन देणेस श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील विद्यामंदिर मनपा शाळा क्र.१० मधील पश्चिम दक्षिण बाजूची खुली जागा कायमस्वरुपी शेड उभारणेस प्राथमिक शिक्षण अधिकारी यांनी संमत्ती दिलेनुसार महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालास बाजारपेठ उपलब्ध करुन देणेसाठी श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील विद्यामंदिर मनपा शाळा क्र.१० मधील पश्चिम दक्षिण बाजूची खुली जागेवर कायमस्वरुपी शेड उभारणेसाठी देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर,

नगर अभियंता (नादनि)

[signature]
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

<u>सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका</u>

**महासभा क्रमांक :- ०३**

दिनांक :- ०७/०६/२०१८

ठराव क्रमांक :- 26

विषय क्रमांक :- ऐन.

---

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०७/०६/२०१८ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील कलम १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगलीवाडी स.न.४१/१ब/१, ४१/२अ,२ब,२क या जागेवरील प्राथमिक शाळा व क्रिडांगणाचे आरक्षणाखालील जमिनी मधील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेबाबतच्या प्रस्तावावर सभागृहामध्ये चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

उक्त जमिनी मधील मंजूर विकास योजना (सुधारीत) मध्ये पूर्व-पश्चिम १५.२५मी.रस्ता रुंदीने बाधीत होत आहे. तसेच, जमिनीच्या पूर्वेकडील बाजूस ९.१५मी.रुंदीच्या दक्षिणोत्तर चालीच्या रस्त्याने बाधीत होत आहे. तसेच, आरक्षण क्र.२४, प्राथमिक शाळा व क्रिडांगणाच्या आरक्षणाने बाधित होत आहे. प्रारुप विकास योजनेमध्ये सुद्धा या आरक्षणाने बाधित होत आहे. कलम ३०(१) प्रमाणे हिस्सा क्र.१ व २ (पश्चिमेकडील भाग) वरील आरक्षणा ऐवजी रहिवास विभागात दुरुस्ती दर्शविलेली होती. तथापि, शासनाने पश्चिमेकडील हिस्सा क्र.१,२,३ वरील आरक्षण कायम केलेले आहे.

उक्त जमिनीमधील गुंठेवारी रेखांकनात एकूण ४२ भूखंड दर्शविलेले असून, त्यापैकी ३३ भूखंडाचे प्रस्ताव नियमीतीकरणासाठी दाखल झालेले आहेत. त्यामध्ये कच्च्या व पक्क्या स्वरुपाची बांधकामे झालेली आहेत. सदरची बांधकामे ही लोडबेअरींग,आर.सी.सी. इत्यादी स्वरुपाची आहेत. बांधकामाचा पुरावा म्हणून प्रस्ताव धारकांनी सन २००१ पूर्वीचे लाईट बील,पाणी बील, घरपट्टी इत्यादी पुरावा दर्शक कागदपत्रे सादर केलेली आहेत. ती कागदपत्रे नियमितीकरणाच्या विचारास पात्र आहेत. तसेच, हिस्सा क्र.३ मध्ये कोणताही गुंठेवारी विकास झालेला नाही.

सबब, सांगलीवाडी स.नं.४१/१ब/१, ४१/२अ,२ब,२क येथील आरक्षण क्र.२४, प्राथमिक शाळा व क्रिडांगणाचे एकूण ९७०० चौ.मी.क्षेत्रापैकी गुंठेवारी विकास झालेले क्षेत्र ४५०० चौ.मी.आरक्षणातून वगळून उर्वरित ५२०० चौ.मी. क्षेत्रावर पूर्वीचेच प्राथमिक शाळा व क्रिडांगण हे आरक्षण ठेवणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये योग्यतो फेरफाराचा प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा. दिलीप पाटील)

अनुमोदक :- (मा. किशोर जामदार)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

(नगररचना)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३**

दिनांक :- ०७/०६/२०१८

ठराव क्रमांक :- २७

विषय क्रमांक :- ऐन.

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२६/०३/२०१८ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील सांगली रि.स.नं.२६९/१ मध्ये शाळा क्र.२२ जवळ/ फायर स्टेशन जवळील इमारत व जागेवर १७०.०० चौ.मी. एवढ्या खुल्या जागेवर २०.८०मी.x८.१०मी.= १६४.४८चौ.मी. बांधणेत येत असलेल्या व्यायाम शाळेचे मुल्यांकन वार्षिक भाडे र.रु.५,७६,६००/- मात्र (अधिक GST) व मा.सहा.संचालक नगररचना यांनी सुचविलेनुसार व महानगरपालिकेच्या शर्ती-अटीनुसार योग्यत्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन घेवून भाड्याने देणेस मान्यता देणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर केला आहे. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सांगली रि.स.नं.२६९/१ मध्ये शाळा क्र.२२ जवळ/ फायर स्टेशन जवळील इमारत मधील व्यायाम शाळा अध्यक्ष, सत्यशोधक शिक्षण व बहुउद्देशिय कार्यकारी संस्था,सांगली ही संस्था मागासवर्गीय व झोपडपट्टी वस्ती मधील नागरिकांसाठी मोफत काम करते. सदर ठिकाणीची जागा व्यायाम शाळेस मिळाल्यास त्या वस्ती मधील मुलांना व नागरिकांना त्याचा विनामुल्य वापर करणेस मिळेल. तसेच,त्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने व लहान मुलांना व्यायामाची आवड निर्माण होणेच्या दृष्टीने सदर संस्थेने मागणी केलेनुसार नाममात्र वार्षिक भाडे र.रु.५०,०००/- मा.शासन मान्यतेने व दर तीन वर्षानी ५% भाडेवाढ करणेच्या अटीवर महापालिकेच्या शर्ती-अटीनुसार योग्यत्या स्टम्प पेपरवर करारपत्र करुन घेवून, २९ वर्षे मुदतीने भाड्याने देणेस ही सभा मान्यता देत असून, सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे मान्यतेस्तव सादर करणेस योग्यती कार्यवाही प्रशासनाने ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नगरसचिव
महानगरपालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- ०७/०६/२०१८

ठराव क्रमांक :- २८

विषय क्रमांक :- ऐन.

---

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२६/.०३/२०१८ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील पाळीव श्वान बाळगणाऱ्या नागरिकांध्यावर अनुज्ञप्ती व सदर पाळीव श्वान मालकावर प्रति श्वान प्रती वर्षासाठी रु.५०००/- मात्रची किमान फी आकरणी करणेस मान्यता देणेकामी धोरणात्मक निर्णयासाठी विषयांकित प्रस्ताव सादर करणेत आला आहे. प्रस्तुत विषयी सभागृहात सविस्तर चर्चा होवून, चर्चेअंती ही सभा प्रस्तुतचा विषय रद्द करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

वैद्य. आरोग्याधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- ०७/०६/२०१८

ठराव क्रमांक :- 2१

विषय क्रमांक :- ऐन.

---

सोबतची मा.प्रियांका सुरेश बंडगर यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील कलम १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वानलेसवाडी येथील स.नं.३३ मधील ओपनस्पेस श्री.बाळुमामा बहुउद्देशीय सेवा संस्था, वानलेसवाडी या सामाजीक संस्थेने भाडेतत्वावर मिळणेची लेखी मागणी केली आहे.त्यानुसार प्रशासनाने प्रस्तावित जागेचे सहा.संचालक नगररचना यांचेकडून भाडेमुल्य निर्धारित करुन घेवून, त्यापेक्षा कमी म्हणजेच, नाममात्र भाड्याने देणेस ही सभा मान्यता देत असून, त्याबाबतची योग्यती कार्यवाही प्रशासनाने ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सुचक :- (मा.किशोर जामदार)

अनुमोदक :- (मा.शेडजी मोहिते)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

[illegible] :-

प्रशासनाच्या टिप्पणीशिवाय ऐनवेळच्या विषयात पारित झालेला ठराव मा. आयुक्त यांचे निदर्शनास आणणेस यावा.

नगरपालिका सचिव.
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- ०७/०६/२०१८

ठराव क्रमांक :- ३०

विषय क्रमांक :- १ (ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

नैराश्य निर्मुलन संस्था, सांगली या संस्थेवर डॉ.नामदेव गेंदाप्पा घाडगे हे सचिव पदावर काम करीत असून, महानगरपालिका क्षेत्रातील गोरगरीब नागरिकांचेवर मोफत उपचार करीत असल्यामुळे त्यांच्या चांगल्या उपक्रमासाठी सांगली वॉर्ड क्र.१६ मधील राजर्षी शाहू कॉलनी मधील प्राथमिक शाळा क्र.३८ ही महापालिका मालकीची असून, या शाळेच्या आवाराबाहेर एक खोली नैराश्य निर्मुलन संस्थेस देणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्तावावर प्रशासनाने योग्यती कार्यवाही ठेवून, प्रस्ताव सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर,

मा.(हस्ताक्षर) व्यवस्थापक

[signature]

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका